# उपविभागीय दंडाधिकारीक, उमरगा यांचे अस्थापनेवरील उमरगा व लोहारा तालुक्यातील पोलीस पाटील संवर्गातील रिक्त पदे भरती जाहिरात 2018-2019

## जाहिरात क्रं. 01/2018-19

उस्मानाबाद जिल्हयातील उमरगा उप विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी, यांच्या कार्यक्षेत्रातील उमरगा व लोहारा या तालुक्यातील सोबतचे यादीतील नमुद गावांत व नमुद केलेल्या प्रवर्गातील पोलीस पाटील संवर्गातील रिक्त पदे लेखी स्पर्धात्मक परीक्षेव्दारे भरतीसाठी पात्र उमेदवारा कडून या जाहिराती व्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्रं | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 01 | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक. 18/04/2018 सकाळी 10.00 ते दिनांक. 03/05/2018 सायंकाळी 5.45 पर्यंत. |
| 02 | डि डी. द्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दि. 03/05/2018 रोजी सायंकाळी 5.45 पर्यंत उप विभागीय अधिकारी, उमरगा यांचे नांवे असलेले डी.डी.सह अर्ज सादर करावा. |
| 03 | संकेतस्थळावर प्रवेशपत्र प्रसिध्द करणे | दिनांक. 07/05/2018.रोजी दुपारी 3.00. |
| 04 | परीक्षेचा दिनांक व वेळ | दिनांक. 15/05/2018 रोजी सळाळी 11.00 ते 01.00 |

पोलीस पाटील पदे सरळसेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात www.osmanabad.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदारांनी संपुर्ण प्रक्रिया काळजीपुर्वक समजून घेऊनच अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ विहीत पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत परिक्षा शुल्क चा डिमांड ड्रॉप्ट असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. अर्ज भरतांना वस्तुनिष्ठ व अचुक माहिती भरावी तसेच अर्जासोबत प्रमाणपत्राचे स्व साक्षांकीत छायाप्रती जोडयाव्यात. सादर अर्जातील माहिती आधारेच परिक्षेस बसण्याची संधी उपलब्ध होईल व परिक्षा निकालानंतर निवड करण्यांत येईल, तसेच निवडीसाठी प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणीच्या वेळी माहिती चुक असल्याचे आढळुन आल्यास त्यांची निवड त्याच स्तरावर रदद् करण्यांत येईल व पुढील गुणानुक्रमे असलेल्या उमेदवारास संधी देण्यांत येईल. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळावेळी भेट देवुन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अदयावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील.

**भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रदद करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, उमरगा यांनी राखुन ठेवलेला असुन, त्यांचा निर्णय अंतिम असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

**उमरगा उपविभागातील पोलीस पाटील संवर्गातील रिक्त पदांचा प्रवर्गानिहाय तपशिल**

| अ.क्रं. | प्रवर्ग | महिला आरक्षित पदे | महिला आरक्षण व्यतिरिक्त भरावयाची पदे | सामाजिक आरक्षणानुसार भराव्याची एकुण पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | अ.जाती | 02 | 06 | 08 | सदर पदाचा तपशिल ( संबंधित गावाला कोणत्या प्रवर्गाचे आरक्षण / महिला आरक्षण इ. सविस्तर माहिती ) अटी, व शर्ती, अर्ज कसा करावा, तसेच इतर सर्व अनुषंगीक माहिती व विस्तृत जाहिरात www.osmanabad.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 2 | अ.ज. | 02 | 06 | 08 | |
| 3 | वि.मा.प्र. | 01 | 02 | 03 | |
| 4 | वि.जा.(अ) | 00 | 01 | 01 | |
| 5 | भ.ज.ब. | 01 | 01 | 02 | |
| 6 | भ.ज.ड. | 01 | 02 | 03 | |
| 7 | इ.मा.व. | 04 | 09 | 13 | |
| 8 | खुला | 5 | 13 | 18 | |
| **एकुण** | | **16** | **40** | **56** | |

उपविभागीय दंडाधिकारी,उमरगा
तथा अध्यक्ष, निवड समिती
पोलीस पाटील भरती प्रक्रिया 2017-18.

**-:परिशिष्ट:-**

**01 :- उमरगा व लोहारा तालुका पोलीस पाटील रिक्त पदे, गावाची नांवे- व सामाजिक आरक्षण / महिला आरक्षण**

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुका | सामाजिक आरक्षणाचा प्रवर्ग | महिला समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | धाकटीवाडी | उमरगा | अनुसूचित जाती | नाही |
| 2 | दस्तापूर | लोहारा | अनुसूचित जाती | नाही |
| 3 | नागराळ | लोहारा | अनुसूचित जाती | नाही |
| 4 | पारसखेडा | उमरगा | अनुसूचित जाती | नाही |
| 5 | एकोंडी जा. | उमरगा | अनुसूचित जाती | नाही |
| 6 | तोरंबा | लोहारा | अनुसूचित जाती | **महिला** |
| 7 | बेलवाडी | लोहारा | अनुसूचित जाती | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | चिंचोली का. | लोहारा | अनुसूचित जाती | **महिला** |
| 9 | कोळेवाडी | उमरगा | अनुसूचित जमाती | **महिला** |
| 10 | कोळसुर गुं | उमरगा | अनुसूचित जमाती | नाही |
| 11 | कास्ती बु | लोहारा | अनुसूचित जमाती | नाही |
| 12 | एकोंडीवाडी | उमरगा | अनुसूचित जमाती | नाही |
| 13 | रामपूर | उमरगा | अनुसूचित जमाती | **महिला** |
| 14 | जकेकुरवाडी | उमरगा | अनुसूचित जमाती | नाही |
| 15 | नाराळ गुं | उमरगा | अनुसूचित जमाती | नाही |
| 16 | चिंचोली जा. | उमरगा | अनुसूचित जमाती | नाही |
| 17 | व्हंताळ | उमरगा | विशेष मागास वर्ग | **महिला** |
| 18 | राजेगाव | लोहारा | विशेष मागास वर्ग | नाही |
| 19 | बलसूर | उमरगा | विशेष मागास वर्ग | नाही |
| 20 | अंबर नगर | उमरगा | विमुक्त जाती( अ) | नाही |
| 21 | गुंजोटीवाडी | उमरगा | भटक्या जमाती (ब) | **महिला** |
| 22 | हिप्परगाराव | उमरगा | भटक्या जमाती (ब) | नाही |
| 23 | तुगाव | उमरगा | भटक्या जमाती (ड) | नाही |
| 24 | केसरजवळगा | उमरगा | भटक्या जमाती (ड) | **महिला** |
| 25 | तावशीगड | लोहारा | भटक्या जमाती (ड) | नाही |
| 26 | गुगळगाव | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 27 | वागदरी | उमरगा | इतर मागास वर्ग | **महिला** |
| 28 | कंटेकुर | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 29 | दुधनाळ | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 30 | आरणी | लोहारा | इतर मागास वर्ग | नाही |
| 31 | चिंचोली (भू) | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 32 | दाळींब | उमरगा | इतर मागास वर्ग | **महिला** |
| 33 | दाबका | उमरगा | इतर मागास वर्ग | **महिला** |
| 34 | बेळंब | उमरगा | इतर मागास वर्ग | **महिला** |
| 35 | मुळज | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 36 | जकेकुर | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 37 | करजगाव | लोहारा | इतर मागास वर्ग | नाही |
| 38 | सुपतगाव | उमरगा | इतर मागास वर्ग | नाही |
| 39 | मळगीवाडी | उमरगा | खुला | नाही |
| 40 | पळसगाव | उमरगा | खुला | **महिला** |
| 41 | काटेवाडी | उमरगा | खुला | **महिला** |
| 42 | मोघा बु. | लोहारा | खुला | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 43 | माळेगाव | लोहारा | खुला | नाही |
| 44 | वरनाळवाडी | उमरगा | खुला | नाही |
| 45 | मानेगोपाळ | उमरगा | खुला | नाही |
| 46 | कोंडजीगड | लोहारा | खुला | नाही |
| 47 | माकाणी | लोहारा | खुला | नाही |
| 48 | मुर्शदपुर | लोहारा | खुला | नाही |
| 49 | कानगाव | लोहारा | खुला | नाही |
| 50 | कोळसूर क. | उमरगा | खुला | नाही |
| 51 | बोरी | उमरगा | खुला | नाही |
| 52 | नाइकनगर मु. | उमरगा | खुला | **महिला** |
| 53 | कोरेगाववाडी | उमरगा | खुला | **महिला** |
| 54 | आचार्य तांडा | उमरगा | खुला | नाही |
| 55 | फुलसिंगनगर | उमरगा | खुला | नाही |
| 56 | इंगोले तांडा | उमरगा | खुला | **महिला** |

उपविभागीय दंडाधिकारी,उमरगा
तथा अध्यक्ष, निवड समिती
पोलीस पाटील भरती प्रक्रिया 2018-19

**-:किमान आवश्यक अर्हता:-**

खाली नमुद केलेली अर्हता 18/04/2018 या दिनांकास प्रमाणपत्रा सहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| क्रं. | पदनाम | किमान आवश्यक आर्हता |
|---|---|---|
| 01 | पोलीस पाटील | 1. अर्जदार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.<br>2. **अ)** वयोमर्यादे करिता अर्जदाराचे दिनांक 18/04/2018रोजीचे वय विचारात घेतले जाईल.<br>**ब)** अर्जदाराचे वय दि.18/04/2018 रोजी 25 वर्षापेक्षा कमी नसावे व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>**क)** पोलीस पाटील पदांकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.<br>3. अर्जदार, संबंधित गावाचा स्थानिक व कायम रहिवासी असावा.<br>4. अर्जदार शारिरिकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्रय निष्कलंक असणे आवश्यक.<br>5. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील लहान |

| | | |
|---|---|---|
| | | कुटुंबाची आर्हता धारण करणे आवश्यक आहे.<br>6. मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदांकरिता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकाऱ्यांने निर्गमीत केलेले जातीचे मुळ प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.<br>7. अनुसुचित जाती/ अनुसूचीत जमाती वगळुन अन्य मागास प्रवर्गातील अर्जदार ( वि.जा. (अ), भ.ज.(ब), **भ.ज.(क),** भ.ज.(ड), वि.मा.प्र.व इ.मा.व ) यांना सन2018-19 या कालावधी करिता वैध असलेले उन्नत अणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्या बाबतचे (नॉन-क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>8. राखीव महिला पदासाठी अर्ज सादर करणाऱ्या महिला अर्जदारांना सन 2018-19 या कालावधी करिता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्या बाबतचे (नॉन-क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याने निर्गमीत केलेले प्रमाणपत्र आवश्यक राहील. |

**-:परीक्षेचे स्वरुप :-**

| **अ.क्रं.** | **पदनाम/संवर्ग** | **परीक्षेसाठी गुण** | | |
|---|---|---|---|---|
| 01 | पोलीस पाटील | लेखी परीक्षा | मौखीक परीक्षा- (मुलाखत) | एकुण गुण |
| | | 80 | 20 | 100 |

लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे राहील.

1. पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षा 80 गुणांची असेल, प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2. लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3. लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) पर्यंतचा अभ्यासक्रमावर आधारित असेल यामध्ये सामान्यज्ञान, गणित, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयांचा समावेश राहील.
4. लेखी परीक्षेत एकुण 80 गुणापैंकी किमान 36 गुण (45%) गुण प्राप्त केलेल्या उमेदवारा मधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील उमेदवारांची तोंडी परिक्षा (मुलाखत) घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं. प्रनिम/2010/209/प्र.क्रं.66/10/13-अ दिनांक.16/10/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेनचा वापर करावा लागेल.

**:- निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती.:-**

1. पोलीस पाटील पदाचे लेखी परीक्षेत एकुण 80 गुणापैंकी किमान 36 गुण (45%) गुण प्राप्त केलेल्या उमेदवारा मधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील उमेदवारांची तोंडी परिक्षा (मुलाखत) घेण्यात येईल व ऐकुण 100 गुणांच्या परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर निवड करण्यांत येईल.

2. प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक पात्रता व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्राचे तपासणीसाठी उपलब्ध करून दयावी लागतील. अन्यथा तोंडी परीक्षा/ अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
3. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास, पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यांत येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुखाखात) परीक्षेस हजर राहणे अनिवार्य राहील. तोंडी परीक्षेस (मुखाखातीस) अनुपस्थीत राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा अर्जदार पोलीस पाटील पदावरील निवडीकरीता पात्र राहील.
4. **उमेदवारास समान गुण मिळाल्यास निवड** :- शासन निर्णय क्रमांक बीव्हीपी 1113/ 1767/ प्र.क्रं. 592 /पोल -8 दिनांक. 22/8/2014 नुसार गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी दोन किंवा त्यापेक्षा अधिक उमेदवार समान गुण धारण करीत असतील तर अशा उमेदवाराचा गुणवत्ता क्रम खालील निकषावर लाऊन अंतिम निवड केली जाईल.
   1. पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर
   2. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणीक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर
   3. माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर
   4. वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

      पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि त्यांची दोन मुले यांचा समावेश असेल, त्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणुन विचार करता येणार नाही.
   5. लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा (मुलाखात), कागदपत्रे छाननी इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सुचना या केवळ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत येतील. पोष्टादवारे पाठविण्यांत येणार नाहीत. सबब भरती प्रक्रिये दरम्यान सदर संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रम इ. बाबत अदयावत व सजग राहाण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी अर्जदारांची राहील.
   6. लेखी परीक्षे अंती मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची जाहिराती नुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यांकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहिर करण्यांत येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांच्या आधारें परीपुर्ण सिध्द होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करिता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रध्द होऊ शकेल.
   7. अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्या बाबतचे अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैदयकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैदयकीय तपासणी अंतीच निश्चीत करण्यांत येईल.

8. अर्जदाराचे चारित्रय निष्कलंक असल्या बाबतचे सबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्रय प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
9. अर्जदार कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंधित नसावा. अर्जदार हा नेमणूकीच्या गावी स्थानिक स्वरूपाचा उदयोग करणारा नसावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपुर्ण वेळ नौकरी वा धंदा करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा, तसेच खाजगी किंवा निम सरकारी संस्थेचा सदस्य नसावा अथवा पुर्ण वेळ नौकरी करणारा नसावा. या बाबतचे रूपये 100 /- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
10. पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरिता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलाच्या वारसाने अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी पोलीस पाटलांच्या वारसाला त्याच्या बरोबर इतरही काही उमेदवारांना सर्वाधिक व समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलाच्या वारसांची निवड करण्यांस प्राधान्य देण्यांत येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (सेवा प्रवेश्. पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळावेळी करण्यांत आलेल्या सुधारणानुसार सर्व अटी व शर्ती पूर्ण करित असला पाहिजे तसेच तो त्या गावासाठी ठरविण्यांत आलेल्या सामाजिक/ समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.
11. अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
12. अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असु शकतो सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यांत येतील.
13. प्रत्येक गावांत केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षित करण्यांत आलेले आहे. **(अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासूनच अर्ज करावा. ( आरक्षण व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नये )**
14. संपुर्ण उस्मानाबाद जिल्हयात सर्व उपविभगसाठी एकाच दिवशी एकाच वेळी परीक्षा घेण्यांत येईल.
15. संपुर्ण भरती प्रक्रिया गावानिहाय होणार असुन कोणत्याही दोन गावांच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
16. पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
17. पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर ( Field work) काम करावे लागते त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे.
18. पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते. त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडु यासारखी समांतर आरक्षणे लागु नाही.
19. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रं. बीसीसी-2011 /प्र. क्रं.1064 /2011/16-ब दि.12/12/2011.मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक 2136/2011 मध्ये दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्य न्यायलय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहुन तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांका पासुन 06 महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती रध्द करण्यांत येईल.

**20.** महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 ( सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. 08) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासुन अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगट (क्रिमीलेअर) तत्व वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र.व इतर मागास प्रवर्ग यांना लागु आहे. सदर प्रवर्गातील अर्जदराकडे दि.31 मार्च 2019 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअरचे तत्व अनुसूचीत जाती/ अनुसूचीत जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील. तसेच त्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमीत केलेले मुळ प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**21.** शासन, महिला व बाल विकास विभागा कडील निर्णय क्रं. 82/2001/मसेआ-2000/प्रं.क्रं. 415 /का-2 दिनांक.25/5/2001 आणि तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशासुसार महिला आरक्षण अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी सन 2018-2019 या कालावधी करिता वैध असलेले(दिनांक.31/3/2018 उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्या बाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**22.** सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसुचना क्रं. एसआरव्ही 2000/प्रं.क्रं. 17/2000/12 दिनांक.28/3/2005 व क्रं. एसआरव्ही 2000/ प्रं. क्रं.17/2000/12 दिनांक.1/7/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दि.28/03/2005 रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्याच्या संख्ये बाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवरांनेही विहीत अ- नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**23.** याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असेलेल नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकातील नेमणूकीसाठी इतर प्रचलीत असलेल्या अटीसुध्दा बंधनकारक असतील.

**24.** ही जाहिर सुचना प्रसिध्द होणे पुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदासाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रध्द झाले आहेत असे समजण्यांत येईल. असे अर्जदार यांनी जाहिरातीचे अनुषंगाने मुदतीतच अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

**:- अर्ज करण्याची पध्दत**

1. उमेदवारांनी अर्ज भरण्यापुर्वी www.osmanabad.nic.in या संकेतस्थळावर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी. अर्ज करण्या सबंधीच्या सविस्तर सुचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत त्या सर्व सुचना उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन त्या सुचनाच्या अनुषंगाने अर्ज भरावा.
2. प्रस्तुत पदाकरिता विहीत नमुन्यातील परिपुर्ण भरलेले अर्ज दि.18/04/2018 ते 03/05/2018 या कालावधीत उप विभागीय अधिकारी कार्यालय, उमरगा येथे कार्यालयीन वेळेत स्विकारन्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यांत येणार नाहीत. उमेदवारांनी अर्जात अचुक इ-मेल आयडी व मोबाईल क्रं. नोंदविणे आवश्यक आहे. इ-मेल आयडी व मोबाईल क्रं. चुकीचा/अपुर्ण असल्यास संपुर्ण भरती प्रक्रिया दरम्यान त्यादवारे पाठविल्या

जाणाऱ्या सुचना, संदेश इ. माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सबंधीत उमेदवाराची राहील.

3. उमेदवाराची माहिती संगणकावर एकत्रीत करण्यांत येणार आहे. परीक्षेसाठी विहीत केलेला अर्ज www.osmanabad.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्जासोबते परीक्षा शुल्क चे डिमांड ड्रॉप्ट जोडणे आवश्यक आहे, परिक्षा शुल्कचे ङि ङि शिवाय अर्ज स्वीकृत केला जाणार नाही.
4. परीक्षेचा प्रवेशपत्र डाऊनलोड करतांना आपणास आपले नांव व आपली जन्म तारीख अचुक नमुद केल्यानंतरच आपले प्रवेशपत्र आपणास डाऊनलोड करता येईल.
5. चुकीचे नांव व चुकीची जन्म तारीख नमुद केल्यास आपणास प्रवेशपत्र डाऊनलोड करता येणार नाही याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.
6. अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननी शिवाय परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येत आहे. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्याशिवाय निवडीस / मुलाखातीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा मुलाखतीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने सबंधीत पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासुनच अर्ज करावा.
7. भरती प्रक्रियेच्या संदर्भातीलक सर्व माहिती अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना तसेच अर्जाचा विहीत नमुना व त्यानुषंगाने होणाऱ्या बदला बाबतची सर्व माहिती www.osmanabad.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल याची नोंद घ्यावी.

:- **महत्वाच्या सुचना:-**

1. उमेदवाराने भरलेल्या माहितीच्या आधारे त्यास प्रवेशपत्र (one line Hall ticket) देऊन परीक्षेस बसण्यासाठी पात्र करण्यांत येईल, उमेदवारांची निवड अंतिम गुणवत्ता यादीत झाल्यास अर्जाप्रमाणे त्याची सर्व मुळ प्रमाणपत्रे अभिलेखे यांची सत्यता पडताळणी करण्यांत येईल. सत्यता पडताळणीच्या वेळेस उमेदवाराने भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या माहिती व्यतिरिक्त सादर केलेल्या इतर कागदपत्राचा विचार केला जाणार नाही. तसेच पडताळणी करतांना उमेदवारांने भरलेल्या अर्जात नमुद केलेल्या बाबीचे प्रमाणपत्र/ अभिलेख तो सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला भरती प्रक्रियेतून बाद करून पुढील गुणानुक्रमे असलेला उमेदवार संधीस पत्र राहील.
2. अर्ज उप विभागीय अधिकारी कार्यालय उमरगा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक. 03/ 05/ 2018 रोजी 5.45 वाजे पर्यंत केवळ प्रत्यक्ष दाखल केलेले अर्ज स्विकारले जातील, विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारीले जाणार नाहीत व त्यावर विचार करण्यांत येणार नाही.
3. परीक्षा शुल्क चा ङि ङि **उप विभागीय अधिकारी, उमरगा** यांचे नांवे व उमरगा येथे देय असलेला दिनांक.18/4/2018 ते 03/04/2018 या कालावधीतील राष्ट्रीयकृत बँकेतून काढलेला असावा.
4. पोलीस पाटील पदाच्या, अपात्र अमेदवारांच्या यादया दिनांक.05/ 05/ 2018 रोजी www. osmanabad. nic.in या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल.त्यास

आक्षेप कालावधी दिनांक.10/05/2018 पर्यंत कार्यालयीन वेळे पर्यंत ठेवला आहे. दिनांक.10/05/2018 नंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

5. पोलीस पाटील पदास पात्र उमेदवाराकरिता सदर प्रवेशपत्र त्यानी ऑनलाईन पध्दतीने दि.05/05/2018 रोजी पासुन डॉनलोड करून घ्यावयाचे आहेत. या कार्यालया मार्फत प्रवेशपत्र निर्गमीत केले जाणार नाहीत अथवा डाकेदवारे पाठविण्यांत येणार नाहीत.
6. लेखी परीक्षा दिनांक.15/05/2018 रोजी सकाळी 11- ते 01.00 या वेळेत घेण्यात येईल.
7. प्रवेशपत्रावरील केंद्र व बैठक व्यवस्था बदलण्यासाठी कोणीही संपर्क करू नये, केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.
8. अर्ज पक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपुर्ण भरुन विहीत परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रूपरेषा/ वेळापत्रक/ परीक्षा केंद्र/ बैठक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अदयावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
9. अर्ज सादर केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस / कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांनी नियुक्ती समाप्त करण्यांत येईल व त्याचा विरुध्द कायदेशीर कारवई करण्यांत येईल.
10. अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.
11. परिक्षेस / कागदपत्र पडताळणी/ तोंडी मुलाखतीस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
12. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रीकेमध्ये कोणताही प्रश्ना बाबत लेखी परीक्षेच्या दिवशी संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत लेखी आक्षेप उप विभागीय अधिकारी, उमरगा यांचेकडे नोंदवावेत. लेखी परीक्षेच्या दिवशी आदर्श उत्तरपत्रिका -(Answer Key)या कार्यालयाचे www. osmanabad. nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. नमुना उत्तरपत्रीकेस आणि प्रश्नपत्रिकेस प्रश्यनास/ पर्याय यास आक्षेप असल्यास तसे लेखी आक्षेप पोलीस पाटील निवड समीती, तथा उप विभागीय अधिकारी, उमरगा यांचेकडे दि.15/05/2018 रोजी सायंकाळी 6.00 वाजे पर्यंत सादर करावेत. दि. 15/05/2018 रोजी सायंकाळी 6.00 नंतर प्राप्त होणारे आक्षेपाचा विचार केल जाणार नाही. या बाबत निवड समिती, उप विभागीय अधिकारी उमरगा यांचा निर्णय अंतिम राहील.

**13. परीक्षा शुल्क :/-**

| | | |
|---|---|---|
| **01.** लेखी परिक्षा | **खुला प्रवर्ग** | **राखीव प्रवर्ग** |
| | **रू. 400/-** | **रू 200/-** |

02. माजी सैनिकांना अर्जा सोबत आवेदनशुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

03. परिक्षा शुल्क भरणेसाठी उप विभागीय अधिकारी, उमरगा यांचे नांवे असलेला कोणत्याही राष्ट्रीयकृत शुल्क भरणेसाठी बँकेचा डि डि स्वरुपात स्विकारण्यांत येईल.

04. खुल्या प्रवर्गासाठी रू 400/- (अक्षरी रू. चारशे फक्त) व राखीव प्रवर्गासाठी रू. 200/- ( अक्षरी रू. दोनशे फक्त) असे परीक्षा शुल्क राहील. सदरचे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

14. पोलीस पाटील रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील.

| क्रं. | भरती प्रक्रीया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| 1 | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक. 18/04/2018 सकाळी 10.00 ते दिनांक. 03/05/2018 रोजी सायंकाळी 5.45 पर्यंत. |
| 2 | डि डि दवारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दि. 03/05/2018 रोजी सायंकाळी 5.45 पर्यंत उप विभागीय अधिकारी, उमरगा यांचे नांवे असलेले डी.डी.सह अर्ज सादर करावा. |
| 3 | संकेतस्थळावर प्रवेशपत्र प्रसिध्द करणे | दिनांक. 07/05/2018.रोजी दुपारी 3.00. |
| 4 | लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ | दिनांक.15/05/2018 रोजी सळाळी 11.00 ते 01.00 |

**उपविभागीय दंडाधिकारी, उमरगा**
**तथा अध्यक्ष, निवड समिती**
**पोलीस पाटील भरती प्रक्रिया.2018**

# पोलीस पाटील पदासाठी अर्जाचा नमुना

---

अर्जाचा कार्यालयीन तपशील

| पद | नोंद वहितील अर्जाचा नोंदणी क्रमांक | अर्ज प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| पोलीस पाटील | | /०४/२०१८ |

-------------------------------------------------------------------------------------------

| |
|---|
| **छायाचित्र लावून त्यावर स्वाक्षरी करावी** |

प्रति,

उपविभागीय अधिकारी तथा

उपविभागीय दंडाधिकारी, **उमरगा**

विषयः पोलीस पाटील मौ. --------- ता. --------- जि. उस्मानाबाद पदासाठी अर्ज.

१.अर्जदाराचे संपुर्ण नाव (मराठीमध्ये):

आडनाव : ------------------

स्वतःचे नावः------------------

वडिलांचे / पतीचे नावः---------

२.पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ताः ----------------------------

घर क्र. -- गाव / शहर ---------

पोष्ट ---------- तालुका--------

जि. उस्मानाबाद. पिन कोड ------

संपर्क क्रमांक

ई-मेल -----------------------

३.जन्म दिनांकः

| दिवस | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

४.जन्म दिनांक अक्षरातः ---------------------------------------------

५.दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे वयः

| दिवस | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

६.राष्ट्रीयत्वः ---------------

७.उमेदवार पुरुष अथवा स्त्री

| पुरुष | स्त्री |
|---|---|

योग्य चौकोनात ✓ अशी खुण करा.

८.संबंधीत गावाचे जाहिर प्रगटनानूसार आरक्षित प्रवर्गः--------

९.अर्जदाराची जातः----------

१०.जातीचा प्रवर्ग (खालील चौकोनात ✓ अशी खुण करावी)

| अ.जा | अ.ज | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

११.जातीचे प्रमाणपत्र देणा-या अधिका-यांचा हुद्दा, प्रमाणपत्र क्रमांक व दिनांकः-------------------
-----------------------------------------------------------------------

१२.अर्जदाराची शैक्षणिक पात्रताः

| अ.क्र. | शैक्षणीक पात्रता | संस्थेचे नाव/बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१३.महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? होय / नाही

१४.अर्जदार पोलीस पाटील यांचा वारस आहे काय ? होय / नाही

(असल्यास तहसिलदार यांच्या प्रमाणपत्रांची साक्षांकीत प्रत जोडावी )

१५.धनाकर्ष ( डिमांड ड्राफ्ट ) बाबत तपशीलः

| बँकेचे नाव | शाखा | डिमांड ड्राफ्ट क्रमांक | रुपये | दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

अर्जासोबत खालील साक्षांकीत प्रती जोडाव्यातः

१.एस. एस. सी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र

२.जन्मतारखेचा सक्षम पुरावा
३स्थानिक रहिवाशी पुरावा (संबंधीत तहसिलदार, तलाठी किंवा ग्रामसेवक यांनी दिलेले रहिवाशी प्रमाणपत्र )
४.शारीरीकदृष्ट्या सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र
५.चारित्र्य प्रमाणपत्र
६.लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
७.जातीचे प्रमाणपत्र (आरक्षित पदांकरिता)
८.नॉन क्रिमिलीअर सर्टिफीकेट
९.राष्ट्रीयकृत बँकेचा डि. डि.

मी याव्दारे पगमाणित करतो / करते की, माझ्या माहितीनुसार वरील तपशील सत्य व अचुक आहे. या माहितीतील कोणताही तपशील चुकीचा / खोटा आढळ्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल व माझेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची मला जाणिव आहे.

ठिकाणः
दिनांकः                                                    उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

---

# लहान कुटुंब प्रतिज्ञापन

सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना भाग चार - अ ) म. शा. राजपत्र, एप्रिल २८, २००५ / वैशाख ८, शके १९२७

प्रतिज्ञापन

नमुना - “अ”
(नियम ४ पहा)

मी, श्री/श्रीमती/कुमारी ------------------------, श्री. ------------------------यांचा/ यांची मुलगा/ मुलगी/पत्नी, वय ------वर्षे, रा. ---------यांव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

(१) मी ------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) (२)आज रोजी मला ------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दिनांक ------------यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ----------

नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची, मला जाणीव आहे.

ठिकाणः

दिनांकः सही

---